# एकटा

**डॉ. मनोज भाटवडेकर**

## साकेतचं निदान त्याच्या डॉक्टरांनी 'मतिमंद' असं केलं होतं. पण त्याची समस्या वेगळी होती, दुर्मिळ होती.

उपचारांसाठी येणाऱ्या मुलांच्या केसेस बहुतेक वेळा पाच वर्षांपुढच्या असतात समोरची केस एका लहान मुलाची होती. वय–पावणेदोन वर्ष. त्याला पाठवणाऱ्या डॉक्टरांनी चिठ्ठीत लिहिल होतं. 'हा मुलगा मतिमंद असावा असं वाटतं. तपासणी करून मार्गदर्शन करावं ही विनंती.'

''आपण असं करू या डॉक्टर, मी त्याला घेऊन बाहेर बसतो. नाहीतर तो मधेमधे गडबड करील आणि आपल्याला बोलू देणार नाही. त्याची आई तुम्हाला सगळी माहिती सांगेल.''

''डॉक्टर, पहिल्यापासूनच साकेतमध्ये काहीतरी दोष आहे असं आम्हाला वाटत होतं पण हे मानायला आमचं मन तयार होत नव्हतं. आमच्या डॉक्टरांनी यावेळी मात्र आग्रहच धरला, म्हणून शेवटी त्याची तपासणी करून घ्यायचं ठरवलं.''

'कसला दोष म्हणताय तुम्ही?'

''तो नीट बघत नाही. म्हणजे, कधी कधी हाकेला प्रतिसाद देतो. नाही असं नाही पण तो कुठेतरीच बघत असतो. बघितलं तर समजून हसत नाही. एरवी आपणहून मोठ्याने निरर्थक हसतो. नुसतं बसवलं तर सारखा पुढेमागे झुलत राहतो. मुख्य म्हणजे बोलत नाही. आम्ही दोघंही सुशिक्षित असून आमच्या पोटी असं मंदबुद्धी मूल जन्माला यावं याचं खरोखरच वाईट वाटतं.''

'मला त्याची पार्श्वभूमी थोडीशी सांगा. गरोदरपणात तुम्हाला काही त्रास झाला होता का?'

''नाही''

'त्याआधी गर्भपात वगैरे?'

''नाही, आमच्या लग्नाला पाच वर्ष झाली. हा आमचा पहिलाच आणि एकच मुलगा– त्याचा जन्म पूर्ण नऊ महिन्यानंतर झाला. डिलिव्हरी नॉर्मल झाली. त्याला किंवा मला काहीही त्रास झाला नाही. त्यानंतर म्हणावा असा आजारही झाला नाही. हे असं होण्याचं कारण काय. तेच आम्हाला कळत नाही.''

'तुम्ही म्हणालात की, तो बोलत नाही. त्याचे वडील तर मघाशी म्हणाले की तो इथे गडबड करील.'

''अहो. गडबड म्हणजे नुसताच काहीतरी आवाज करत राहतो. मध्येच मोठ्याने ओरडतो, किंचाळतो.''

'बरं, त्याला फिट, आकडी वगैरे काही आली होती का?'

''नाही हो.''

'बरं, खेळतो वगैरे?'

''असा आपल्याशी नाही खेळत. एकतर एकच गोष्ट करत बसेल आणि त्याला कुठल्याही खेळण्याने नीट खेळायचं समजत नाही. म्हणजे त्याच्या हातात जर बॉल दिला, तर तो टाकायचा किंवा झेलायचा त्याला समजत नाही. तो नुसताच जमिनीवर आपटत बसतो, हातातून काढून घेतला की ओरडतो. तासन्तास तो बॉल आपटत राहू शकतो. तो बसल्या जागी कधीच स्थिर नसतो. त्याचं सारखं मागेपुढे झुलणं चालू असतं.''

'बरं. जेवणखाण?'

''भरवलं की खातो. आधी आम्हाला वाटलं की याला नीट ऐकू येत नसावं. पण त्या चाचण्या नॉर्मल आहेत.''

'मला वाटतं. आपण साकेतला आत बोलावू या.' तपासण्याच्या टेबलवर साकेतला ठेवलं. त्याच्या आईने सांगितल्याप्रमाणे तो बसल्याजागीच पुढेमागे झुलायला लागला.

''कधी कधी तो गोलगोलही फिरतो. मधेच टाळ्या वाजवतो किंवा हात आपटत राहतो. कधी कधी नुसतीच मान हलवत राहतो.'' साकेतच्या वडिलांनी माहिती पुरवली. साकेतला हाक मारून, टाळ्या वाजवून, चुटक्या वाजवून त्याचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पण तो त्याच्या गावीही नव्हतं. तो नजरेला नजर देत नव्हता. आपल्याभोवती तीन माणसं उभी आहेत. ती आपल्याशी बोलतायत याचं त्याला मान नव्हतं. तो फक्तं टेबलावर हात आपटत होता. तोंडाने काहीतरी विचित्र आवाज काढत होता. आपल्याच तंद्रीत असल्यासारखा दिसत होता त्याला उभा केल्यावर तो जोराने किंचाळला.

''डॉक्टर, आणखी एक गोष्ट बघा.'' त्याच्या वडिलांनी आपल्या बॅगेतून एक भिंगरी काढली. ती भिंगरी त्याच्यासमोर त्यांनी फिरवली आणि तो एकदम स्तब्ध झाला. त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण आनंद दिसत होता. भिंगरी फिरायची थांबल्याबरोबर त्याने पुन्हा ओरडाओरडा सुरू केला. ''हे आमच्या लक्षात आलंय की कुठचीही गोल फिरणारी वस्तू त्याला आवडते. तो ती पुन्हा पुन्हा फिरवायला लावतो. बोलत तर नाहीच. दुसरं महत्त्वाचं – त्याला गाणं ऐकायला खूप आवडतं. त्याला रोज आम्ही कॅसेट लावून देतो. मग स्वारी खूश असते. बाकी सगळं हिने तुम्हाला सांगितलं असेलच डॉक्टर हा काय प्रकार आहे, डॉक्टर? हा बरा होईल का? आम्ही दोघंही अतिशय काळजीत आहोत.''

साकेतची केस ही नेहमी आढळणाऱ्या केसेसपेक्षा वेगळी आहे. दुर्मिळ आहे. दहा हजारात एखादं मूल असं असू शकतं. वरवर पाहता साकेत मंदबुद्धीचा आहे, असं वाटणं साहजिक आहे– अगदी डॉक्टरांनीसुद्धा अशा मुलाचं निदान अनेकदा मतिमंद असंच केलं जातं. साकेतची समस्या ही मतिमंदांपेक्षा खूप वेगळी आहे. भोवतालच्या वातावरणाशी संपर्क साधू शकणं, माणसांशी संबंध जोडणं, सभोवतालच्या गोष्टींना योग्य प्रतिसाद देणं, ही मेंदूच्या विकासाबरोबर विकसित होणारी कार्य. या विकासात कधी कधी मोठा अडथळा निर्माण होतो. त्याचा मुलाच्या संपूर्ण वागण्यावर, व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. साकेतचं तसंच झालंय. तो सजीव–निर्जीव यांच्यातला भेद नीट ओळखू शकत नाही. माणसांशी आणि निर्जीव वस्तूंशी त्याचं वागणं सारखंच असतं. एकच शारीरिक हालचाल पुन्हा पुन्हा करत राहणं, गोल फिरणाऱ्या वस्तूंबद्दल आकर्षण, संगीताबद्दल आकर्षण आणि भोवतालच्या गोष्टींना विपरीत प्रतिसाद देणं ही लक्षणं आहेत एका दुर्मिळ आजाराची–त्याचं नाव आहे 'ऑटिझम' (Autism) यात मेंदूच्या महत्त्वाच्या आणि अत्यंत मूलभूत कार्यांवर गदा येते. या आजाराचं नेमकं कारण अजूनही सापडलेलं नाही. शास्त्रीय संशोधनातून वेगवेगळे निष्कर्ष निघाले आहेत. काहींच्या मते गर्भावस्थेत असताना निर्माण होणारे दोष किंवा आजार याला जबाबदार असतात. काहींच्या मते वातावरण, परिस्थिती यामधले घटक जबाबदार असतात. मज्जासंस्थेत होणारे रासायनिक बिघाड हेही संशोधनातून सिद्ध झाले आहेत. अशा मुलांच्या मेंदूचे आलेख काढले (EEG), तर त्यातही अनेकदा बिघाड दिसून येतो. यातल्या काही मुलांची बुद्धिमता

सरासरीपेक्षा कमी असण्याची शक्यता असते. पण काही मुलांच्या बाबतीत काही कौशल्यं विशेष चांगली असल्याचंही आढळतं. (डस्टिन हॉफमनची अविस्मरणीय भूमिका असलेला 'रेन-मॅन' हा चित्रपट ज्यांनी पाहिला असेल, त्यांनी आठवून पाहावं, एका ऑटिस्टिक माणसाच्या जीवनावर हा चित्रपट आधारला होता.)

याच्या उपचाराचं काय? साकेतचं भवितव्य काय? त्याच्या आजाराचं निदान नक्की करण्यासाठी मेंदूच्या काही चाचण्या पूर्ण करून घ्याव्या लागतील. अजूनपर्यंत तरी या आजाराच्या उपचारांना मिळणारं यश मर्यादित आहे. औषधोपचाराचा यात थोडासा वाटा आहे. मेंदूतले रासायनिक बिघाड काही अंशी नॉर्मलला आणण्याचं काम औषध करतात. पण त्यालाही मर्यादा आहेत. अशा मुलांना ऑक्युपेशलन थेरपी-कार्योपचार पद्धतींचा उपयोग होऊ शकतो. यात मुलांचा वातावरणाशी संवाद वाढवण्यासाठी, भाषेचा विकास होण्यासाठी, मेंदूच्या वेगवेगळ्या कार्यांचा एकमेकांशी समन्वय साधण्यासाठी विविध माध्यमातून उपचार केला जातो. या मुलांना उपचारात सहभागी करून घेणं ही गोष्ट सोपी नसते. बराच काळ एकाच उपचारकाबरोबर ओळख झाल्यानंतर अपेक्षित प्रतिसाद मुलाकडून मिळू शकतो. अशा मुलांना वाढवणं, त्यांच्याशी संवाद साधणं हा पालकांच्या दृष्टीने निराशाजनक अनुभव असू शकतो. साकेतच्या आई-वडिलांना या सर्व गोष्टी सविस्तर समजावून सांगायला हव्यात. त्यांनी साकेतला स्वीकारण्याची मानसिक तयारी करायला हवी आहे.

**आपलं महानगर, २४ जून १९९७**

**काही बोलायाचे आहे**